
divyamarathi.com

# संगणक साक्षरतेवर ई-बुकचे भवितव्य

Source: जयश्री बोकील, पुणे | Last Updated 06:32(02/05/12)



माध्यम बदलले की आविष्काराचे रूपही बदलते, हे विधान आधुनिक काळात साहित्यालाही लागू पडते आहे. सोशल नेटवर्किंगला सरावलेली नवी पिढी आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे बाळकडू घेऊनच जन्माला येणाऱ्या भावी पिढ्या, यांचा विचार करताना साहित्याच्या प्रांतात आता ई-बुक्सचे वारे जोमाने वाहू लागले आहेत. इंग्रजी भाषेप्रमाणेच देशातील प्रादेशिक भाषांमध्येही ई-बुक्सने वाचकवर्ग मिळवलाय.

माध्यमाला त्याच्या बलस्थानांप्रमाणे काही मर्यादाही जाणवत असतातच. ई-बुक्सदेखील त्याला अपवाद नाही. हे नवे माध्यम आपलेसे करण्याचा ट्रेंड निर्माण झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे. मात्र, ई-बुक्सला पायरसीचा धोका आहेच. अर्थात नव्या पिढीसह बहुतांश वाचक जेवढ्या वेगाने संगणक, इंटरनेटसाक्षर होतील व तंत्रज्ञान बदलेल यावर ई-बुक्सचे भवितव्य अवलंबून आहे.

**नवे माध्यम स्वीकारार्ह** - छापील शब्दांवर जनमानसाचा विश्वास असतो, हा आजवरचा अनुभव आहे. साहित्याचे माध्यम जेव्हा बदलते तेव्हा नेमके कुठले बदल घडू शकतात, नव्या माध्यमाचा स्वीकार साहित्यिक करतात का, काही मान्यवर लेखकांसोबत शेअर केला. तेव्हा काही ज्येष्ठ लेखकांचा अपवाद वगळता बहुतेकांनी ई-बुकचे माध्यम स्वीकारार्ह असल्याचे मत नोंदवले. साहित्य परिवर्तनशील असते तर मग साहित्याचे माध्यम बदलण्यास प्रत्यवाय का असावा, असा सवाल काहींनी केला. माध्यम बदलण्याने लेखनाचा आशय बदलत नाही, तोवर नव्या माध्यमांचा स्वीकार करण्यास हरकत नाही. उलट आपले लेखन नव्या पिढीची ज्या माध्यमाशी अधिक जवळीक आहे, अशा माध्यमातून त्यांच्यापर्यंत पोहोचत असेल, तर ते जरूर आपलेसे करावे, असेच मत बहुतेकांनी मांडले. यापैकी बहुतेक लेखकांनी यापूर्वीच आपले लेखन ई-बुकच्या माध्यमातून प्रकाशित केले आहे. यामध्ये साहित्य अकादमीप्राप्त लेखकांचाही समावेश आहे आणि नवोदित तसेच हौशी स्वरूपाचे लेखन करणारेही आहेत.

मुद्रित शब्दाला जेव्हा दृक्श्राव्य आयाम मिळतो, तेव्हा ते अधिक प्रभावीपणे पोहोचू शकतात. विशिष्ट प्रतसंख्येचे बंधन ई-बुकला नसते. त्यामुळे प्रकाशकांबरोबरचे व्यवहार अधिक पारदर्शक राहण्यास मदत होते. भौगोलिक अंतरामुळे मुद्रित पुस्तकाला वाचकांपर्यंत पोहोचण्यावर जी बंधने येतात ती ई-बुकमध्ये संभवत नाहीत. लेखक आणि वाचक क्षणभरात एकमेकांच्या संपर्कात येतात, हे महत्त्वाचे आहे. प्रकाशकाशिवायदेखील ई-बुक असू शकते, असेही मत व्यक्त झाले.

**ई-बुकची बलस्थाने :-** एका क्षणात जगभरात पोहोचण्याची क्षमता, दृक्श्राव्यतेसह मल्टिमीडियाचा वापर शक्य, डिझाइन, ले-आऊट, चित्रे बदलण्याची सोय, प्रकाशकावरील अवलंबित्व कमी ,व्यवहारातील पारदर्शकता फायदेशीर, नव्या पिढीशी जवळीक साधणारे माध्यम, आवृत्त्यांची वाट पाहणे नाही, जागा, वजन, आकार यांचा प्रश्न नाही, तुलनेने किंमत कमी, डिव्हाइस घेण्याचा खर्च एकदाच, त्यानंतर फक्त डाऊनलोड

**ई-बुकच्या काही मर्यादा** - ऊर्जा अवलंबित्व, बॅटरी अप टू डेट ठेवण्याची गरज, इलेक्ट्रॉनिक माध्यम हाताळण्याची

अनिवार्यता, वर्षानुवर्षे सवयीचा मुद्रित माध्यमाचा फील नाही, टेक्नॉलॉजी शिकण्याची गरज हा वापराचा प्राथमिक निकष, वेगवेगळे टेक्निकल फॉर्मॅट्स येणे आवश्यक, वाचनाची मानसिकता बदलावी लागते

**उगवत्या पिढय़ांसाठी ई-बुक्स** - मंदार जोगळेकर, बुकगंगा डॉट कॉम, पुणे

ई बुक्सचे रोपटे मराठीत रुजवणारे बुकगंगा डॉट कॉमचे मंदार जोगळेकर म्हणाले, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात नित्यनवे शोध लागत आहेत. जागतिकीकरणाचा स्वीकार आपण केल्यावर हे नवे तंत्रज्ञान, नवे प्रभाव, नव्या ज्ञानशाखांपासून आपण अलिप्त राहू शकत नाही, हे लक्षात आल्यावर आपले स्वत्व राखूनही आपल्याला नवे काही स्वीकारता येईल का, याचा विचार सुरू झाला आणि तिथेच बुकगंगाचे बीज रोवले गेले. वाचन आपण कित्येक वर्षे करत आलो आहोत. त्या वाचनाला ई-बुकच्या माध्यमातून एक नवा लूक, नवा आयाम देण्याचा प्रयत्न केला आहे. सुरुवातीला टेक्नोसॅव्ही पिढीचा विचार प्राधान्याने केला होता, पण काही वर्षांच्या अनुभवानंतर सर्व वाचकांकडून ई-बुकला प्रतिसाद मिळत असल्याचे लक्षात आले आहे. केवळ मराठीतच नव्हे, तर अन्य अनेक भारतीय भाषांतून ई-बुक्सची मागणी वाढते आहे.

**ई-प्रकाशक-संपादक लागतील** - रोहन चंपानेरकर, रोहन प्रकाशन, पुणे

यु वा पिढी ई-बुक्सच्या ट्रेंडविषयी स्वागतशील दिसते. करिअर ई-बुक हे नवे माध्यम आहे आणि त्यामध्ये विस्तारण्याच्या प्रचंड शक्यता आहेत. आपल्याकडे अजून फार मोठय़ा प्रमाणात ई-बुक्स सुरू झालेली नाहीत, पण येत्या काही वर्षांत ई-बुक आपल्याला जवळून परिचयाचे होईल, यात शंका नाही. पाश्चात्त्य देशांत तर गेल्या काही वर्षांपासून ई-बुक रीडरशिपचा आलेख उंचावत असून प्रिंट बुकचा आलेख खालावत आहे. आपल्याकडे अद्याप ई-बुकची संज्ञा काहीशा स्थित्यंतराच्या अवस्थेत असल्याचे दिसते. ई-बुक हे इलेक्ट्रॉनिक माध्यम असल्याने त्याची पोहोच (रीच) विलक्षण आहे. भावी काळात ई-बुकप्रमाणेच ई-प्रकाशक, ई-वितरक, ई-संपादक अशाही संज्ञा व करिअरच्या संधी उपलब्ध होतील, असे वाटते.

अर्थात यासाठी सरकारी पातळीवरही 'आकाश' उपक्रमाप्रमाणे प्रयत्न होण्याची गरज आहे. प्रकाशकांनाही गोडाऊन वाढवण्यापेक्षा हार्ड डिस्कची स्पेस वा क्षमता वाढवणे सोयीचे ठरणार आहे. पाश्चात्त्य देशांमध्ये ई-बुकसाठी ई - इंक वापरली जाते आणि त्यामुळे प्रिंट मजकूर वाचल्याचा फील मिळतो. मराठी प्रकाशनविश्वाचा विचार करता आपल्याकडेही पुढच्या काही वर्षांत ई-बुकचा ट्रेंड रुळेल, असा विश्वास वाटतो. सध्या प्रकाशकांकडे संपादनाचे काम करणाऱ्यांमध्ये तेव्हा टेक्नो एडिटर अशी भर पडण्याची शक्यता आहे.

**ई-बुक अटळ, स्वीकार करा** - संजय भा. जोशी, लेखक, पुस्तक चळवळ, पुणे

वेळ, जागा आणि उपलब्धता. या तिन्हीसाठी जर ई-बुक्स अधिक सोयीची असतील तर त्यांचा अधिकाधिक वापर अटळच; पण मुळात वाचनासाठी लागणारा पेशन्स आणि मानसिकता याचाच प्रश्न आहे. लेखक आणि प्रकाशकांनी मात्र ई-बुक्सकडे एक प्रतिस्पर्धी पर्याय म्हणून न बघता बाजारपेठ वाढवणारे नवे पाऊल म्हणून बघायला हवे. ई-बुक्सचे आर्थिक व्यवहार जसे अधिकाधिक पारदर्शक होत जातील तसतसे प्रकाशक विपणनाचे एक नवे माध्यम म्हणून हे स्वीकारतील अशी आशा आहे. पुस्तकाचे वितरण, विशेषत: लांब-लांबच्या प्रदेशात जर अधिक प्रभावीपणाने करायचे असेल तर ई-बुक्स अपरिहार्य आहेत. यात वाचकांचा फायदाच होईल. एखादे पुस्तक पोस्टाने किंवा कुरियरने दूर पाठवण्यापेक्षा नेटवरून डाऊनलोड करणे सुलभ आणि स्वस्त असेल. फक्त त्याचे आर्थिक व्यवहार अधिकाधिक

निदरेष करणे आणि तंत्रज्ञानाचा अधिकाधिक प्रसार करणे हेच खरे आव्हान असेल. तूर्तास लेखक, प्रकाशक आणि वाचक यांनी एकत्र येऊन संगणक आणि विपणन क्षेत्रातील जाणकारांना हाताशी धरून हे क्षेत्र अधिकाधिक निदरेष, प्रभावी आणि पारदर्शक करण्याची नितांत गरज आहे. या दृष्टीने जाणकार लेखक, वाचक आणि प्रकाशक ई-बुक्सचा स्वीकारच नव्हे, तर स्वागत करतील, अशी अपेक्षा आहे.